■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २२८ ■ बुधवार दि.७ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 228 ■ Wednesday Dt.7 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# जो भारताला भिडला त्यांचा करेक्ट कार्यक्रम घडला!

# अखेर न्याय झालाच!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## भारताने पहलगाम हल्ल्याचा घेतला बदला!



# पाकिस्तानला पुन्हा घरात घुसून ठोकलं

# भारतीय सैन्याकडून ऑपरेशन सिंदूर फत्ते!

■ मध्यरात्रीत भारतीय सैनिकांनी घडवली शांतीत क्रांती नऊ दहशतवादी हल्ले उध्दवस्त!

■ भारतात नमोच्या कामगिरीने दहशतवाद्यांची भाईगिरी खतम

■ जो दहशतवादी भारताशी नडला त्यांला भारतीय सैनिकांनी मातीत गाडला

■ अखेर भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राईक करत त्यांना जोरदार प्रत्युत्तर!

बीड । प्रतिनिधी

पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप २६ पर्यटकांच्या मृत्यूचा बदला आज भारतीय सैन्याने घेतला. पहलगामच्या १५ दिवसानंतर भारतीय लष्कराकडून पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी हल्ले उध्वस्त केले. मध्यरात्री २५ मिनिटे चाललेल्या या कारवाईत ६० दहशतवाद्यांचा खात्मा केल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्याची लष्कराकडून पत्रकार परिषद घेत माहिती देण्यात आली.

पहलगाम इथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ६ मेच्या रात्री पाकिस्तानच्या पीओजेकेवरील ९ दहशतवादी दहशतवादी तळांवर एअर स्ट्राइक करून ते उद्धस्त करण्यात आले. साधारण २५ मिनिटांत भारतीय लष्कराने ही कारवाई केली असल्याची माहिती लष्कराच्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. या कारवाईला ऑपरेशन सिंदूर असं नाव देण्यात आलं आणि त्याचं कारणही तसंच होतं. पहलगाममधील या हल्ल्यात पुरूषांना लक्ष्य करत दहशतवाद्यांनी गोळ्या घातल्या. त्यांच्यासोबत असलेल्या अनेक महिलांचे कुंकू पुसले गेले. या महिलांचा आक्रोश संपूर्ण जगाने पाहिला होता. याच कारणाने या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले. विशेष म्हणजे, भारतीय लष्कराने आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दोन महिला अधिकाऱ्यांनी या ऑपरेशनबाबत माहिती दिली आहे. विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी या दोन महिला अधिकाऱ्यांनी लष्कराने केलेल्या या कारवाईबाबत सविस्तर माहिती सांगितली आहे. ही कारवाई कुठे, कशी पार पाडली गेली याची सविस्तर माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

कर्तबगार अधिकारी अशी कर्नल सोफिया कुरेशी यांची ओळख आहे. सोफिया यांचं लहानपणापासूनच वायुसेनेत दाखल होण्याचं स्वप्न होतं. त्या मूळच्या गुजरातच्या रहिवासी आहेत. त्या भारतीय वायुसेनेत हेलिकॉप्टर पायलट आहेत. बायो-केमिस्ट्री या विषयात त्यांनी पदवी घेतली आहे. १९९९ मध्ये चेन्नईस्थित ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीमधून सोफिया यांची भारतीय लष्करात प्रवेश केला. सर्वात उल्लेखनीय म्हणजे बहुराष्ट्रीय लष्करी सराव फोर्स-१८ मध्ये भारतीय लष्कराच्या तुकडीचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी आहेत. पुण्यात झालेल्या फील्ड ट्रेनिंग सरावात सहभागी झालेल्या १७ देशांमधील तुकड्यांमध्ये त्या एकमेव महिला प्रमुख होत्या. त्यावेळी त्यांनी ४० सदस्यांच्या भारतीय तुकडीचे नेतृत्व केले होते. सोफिया कुरेशी यांनी २००६ मध्ये काँगोमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेतही काम केले आहे. सोफिया यांचे आजोबा सैन्यात होते आणि त्यांचे पतीदेखील मेकॅनाइज्ड इन्फंट्रीमधील लष्करी अधिकारी आहेत.

### कोण आहेत कर्नल सोफिया कुरेशी?

कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल पदावरील अधिकारी आहेत. त्या सध्या सिग्नल कॉर्प्समध्ये सेवा देतात. कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय लष्कराच्या पहिल्या महिला अधिकारी आहेत ज्या लष्कराच्या प्रशिक्षण सराव 'एक्सरसाइज फोर्स १८' कार्यक्रमाचे नेतृत्व करत आहेत. सोफिया कुरेशी १९९९ मध्ये शॉर्ट सर्व्हिस कमिशन अंतर्गत सैन्यात सामील झाल्या. त्यावेळी त्यांचे फक्त १७ वर्षांचे होते.

■ ऑपरेशन सिंदूर पाकड्यांचे दहशतवादी अड्डे उद्धस्त

■ कर्नल सुपिया कुरेशी यांनी सांगितला थरार

■ पाकड्याची मस्ती जिरवली दहशतवाद्यांना अद्दल घडवली

■ दहशतवाद्यांनी हिंदू म्हणून महिलांचे कुंकू पुसले भारतीय सैनिक थेट पाकिस्तानच्या घरात घुसले

# माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ आणि समता परिषदेच्या लढ्याला मिळाले यश : ॲड. सुभाष राऊत

## स्थानिक स्वराज्य संस्थांतील ओबीसीचे आरक्षण कायम ठेवल्याबद्दल बीडमध्ये समता परिषदेचा जल्लोष

बीड । प्रतिनिधी

ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भात माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला सन २०२२ पूर्वी लागू असलेले २७ टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याचे आणि राज्यात पुढील ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. याबद्दल समता परिषदेचे राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी सर्वोच्च




न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.छगनरावजी भुजबळ साहेब, ज्यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा सुरू होता असे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्यासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे राज्यभरातील ओबीसी समाजाने स्वागत केले असून बीड शहरामध्ये समता परिषदेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती

▶ पान २ वर

## ब्रह्मगाव येथील जलजीवनचे काम सुरू करा
## उपसरपंच कांबळे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू

माजलगाव । प्रतिनिधी



शहरापासून जवळच असलेल्या ब्रह्मगाव येथील जलजीवन योजनेचे काम तात्काळ सुरू करा या मागणीसाठी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे.

तालुक्यातील ब्रह्मगाव येथे पाणीटंचाईच्या तीव्र झाला जाणवत असून सध्या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामस्थावर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. ब्रम्हगाव येथील जलजीवनच्या कामाचे टेंडर २२ डिसेंबर २०२३ मध्ये झाले असून दोन वर्षे झाले गावात पाणी नाही, नागरिकांचे पाण्यासाठी हालाहाल होत आहेत. त्यामुळे जलजीवांचे काम तत्काळ सुरु करावे, संबंधित गुत्तेदारावर गुन्हे दाखल करा या मागणीसाठी दि.११/०४/२०२५ रोजी याबाबत सविस्तर अर्ज मुख्याधिकारी, जि.प.बीड यांना दिला होता, परंतू त्यांनी अद्यापही कसलीही कार्यवाही केली नसल्याने मी दि.०७ मे २०२५ रोजी पासून जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपसरपंच अनिल राधे कांबळे व दशरथ काबळे यांचे वतीने उपोषण सुरू करण्यात आले आहे.

## बीडमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय

बीड । प्रतिनिधी

शहरातील गजबजलेल्या आणि मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सारडा कॅपिटलमधील एका तळघरात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय चालू होता. ही माहिती मिळताच बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास कारवाई केली. यामध्ये चालकाला बेड्या ठोकल्या असून नाशिकच्या पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे.

प्रमोद सदाशिव शेळके (रा.नेकनूर ता.बीड) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. बीड शहरातील सारडा कॅपिटल परिसरात एका कोपऱ्यातील तळघरात ब्लीस नावाचे स्पा सेंटर आहे. याच ठिकाणी मागील काही दिवसांपासून वेश्या व्यावसाय सुरू असल्याची माहिती होती. मंगळवारी सायंकाळी बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहकाला एक हजार रूपये देत स्पा सेंटरमध्ये पाठविले. आतमध्ये वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा मारला. यात एका पीडितेची सुटका करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखलची प्रक्रिया सुरू होती.

ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉँवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरचे पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, मनोज परजणे, अशपाक सय्यद, सुशेन पवार, सचिन अलगट, रेश्मा कवळे आदींनी केली.

# माजलगाव नगर परिषदेने डम्पिंग ग्राउंड वरील कचरा जाळल्याने केसापुरीकरांचे आरोग्य धोक्यात

## मुख्याधिकारी चव्हाण यांच्या विरोधात आत्मदहन करणार : साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी या ठिकाणी नगर परिषदेने शहरातील घनकचरा टाकण्यासाठी डम्पिंग ग्राउंड असून या ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करण्याऐवजी हा कचरा आठ दिवसात एकदा जाळला जाऊ लागला आहे वेळीच उपाययोजना नाही केली तर केसापुरीकर आंदोलन करणार मागच्या दोन महिन्यापासून घनकचऱ्याची आग सुरूच होती. धुरामुळे अनेक गावातील केसापुरी कम्प या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यासाठी नगरपालिकेला अनेक वेळा सांगून काहीच फरक पडला नाही. या विरोधात केसापुरीचे माजी सरपंच विलासराव साळवे यांनी १७ मे २०२५ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

या स्वच्छतेसाठी महिन्याला २५ लाख रुपये खर्च केला जात होता. डंपिंग ग्राउंड वर टाकलेला कचरा आठ दिवसात एकदा जाळला जातो हा कचरा जळल्याने दोन–तीन दिवस भिजत नाही. त्यामुळे शेजारीच असलेल्या केसापुरी सादोळा भाटवडगाव केसापुरी कॅम्प आबुजवाडी सादोळा आष्टी या



गावातील येणाऱ्या जाणारा मोटरसायकल वरील नागरीकांना मोठा प्रमाणात प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे या गावातील केसापुरी कॅम्पच्या युवक व वृद्ध नागरिकांना दम्याच्या त्रासाने त्रस्त झाले आहेत.

माजलगाव नगरपरिषद देणे बनवलेल्या डम्पिंग ग्राउंड मध्ये नगरपरिषद कचरा आणून टाकते. हा कचरा आणतात कचरा रस्त्यावर पडतो यामुळे दुर्गंधी पसरते घाण वास येतो. मोटारसायकलवर जाणार लोकांना नाहक त्रासला समोर जावा ये लागतात अनेक गावांचे नागरिक या रोजच्या धुरामुळे परेशान होतात. याबाबत गावातील ग्रामस्थांनी नगरपरिषदेला अनेक वेळा लेखी व तोंडी निवेदन करूनही याचा काहीच फायदा होईना उलट नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना या गावच्या प्रतिष्ठित नागरिकांनी भेटून याबाबत सांगितले असता त्यांनी या लोकांना हुजत घालून पुढे बघू ची भाषा वापरल्याचे देखील नागरिक बोलत आहेत.

शहरातून उचलण्यात येणारा ओला व वाळला कचरा वेगळा न करता एकत्र म्हणून तो काही दिवसांनी रात्रीच्या वेळीस जाळला जातो ओलावाला कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी केवळ नावालाच मशनरी आणून त्यावर प्रक्रिया केली जात नाही व माजलगाव नगर परिषदच्या अधिकारी यांचे पितळ उघडे पडेल म्हणून हा कचरा जळण्यात येत असल्याचा आरोप केसापुरीचे माजी सरपंच विलास साळवे व संस्थानिक नागरिक करित आहेत.

## नगरपरिषद प्रशासनाविरोधात हंडामोर्चात उपस्थित रहा : ॲड. राजपूत

बीड । प्रतिनिधी



शहराला कधी नव्हे ते अभुतपूर्व पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून मागील एक महिन्यापासून शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झालेला असून शहरातील नागरिकांना स्वतःच्या खिशाचे पैसे खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सर्वसामान्य गोरगरीब नागरिक पाणी घेऊ शकत नाहीत ते दारोदारी पाण्यासाठी फिरत असल्याचे चित्र शहरात सध्या दिसत असून, पाणी नसल्यामुळे शहरातील नागरिक महिला लेकीबाळी रात्री अपरात्री पाण्यासाठी वन–वन फिरताना दिसत आहेत. नगर परिषदेच्या ढिसाळ व नियोजन शून्य कारभारामुळे शहरातील नागरिकांना संकटाचा सामना करावा लागत आहे.

यामुळे शहरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष व संताप निर्माण झालेला आहे. त्यामुळे दिनांक ९ मे २०२५ शुक्रवारी बीड नगर परिषदेच्या प्रशासना विरोधात निघणारे हंडा मोर्चात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला प्रदेश सचिव व महाराष्ट्र करणी सेनेच्या महिला प्रदेशाध्यक्ष ॲड.संध्याताई राजपूत यांनी केले आहे.

# स्वत:च्या आर्थिक हितापोटी ग्रामपंचायतीची बदनामी करण्याचा प्रयत्न

### पारदर्शक आणि स्वच्छ कारभार असलेली आमची ग्रामपंचायत : आण्णासाहेब शिरसाठ

कडा । प्रतिनिधी

पारदर्शक आणि स्वच्छ कारभार असून सर्वांना विश्वासात घेऊन आजवर कामे करण्यात आली आहेत. काही विघ्न संतोषी लोक स्वताच्या पोळीवर तुप ओढून आर्थिक फायदा साधून घेण्यासाठी ग्रामपंचायतीची बदनामी करत आहेत. विकासाचा लेखाजोखा आरश्या प्रमाणे ठेवला आहे. विनाकारण कोणी गरळ ओकण्याचा प्रयत्न करू नये. विकासकामाचा हिशोब व कामे आम्ही कधीही समोर दाखवू असे सरपंच पती आण्णासाहेब शिरसाठ यांनी सांगितले.

आष्टी तालुक्यातील आरणविहरा–तांगडखेल ग्रुप ग्रामपंचायत असून, या ग्रामपंचायत अंतर्गत गावात विविध निधी सोबतच अनेक ठिकाणी पदरमोड करून



केली आहेत. सीसीटी, दलितवस्ती सुधार योजनेची कामे, रोजगार हमी योजनेचे कामे, पथदिवे, गाव अंतर्गत रस्ते, शाळेची संरक्षण भिंत, अनेक वर्षांपासून स्मशानभूमी नव्हती, तो प्रश्न मार्गी लावला, सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावला, यासह अनेक कामे दर्जेदार केली आहेत. पण गावातील काही विघ्न संतोषी लोकांनी स्वताच्या आर्थिक फायदा व्हावी. बोगस केलेल्या कामाचे पैसे घरात जावेत. यासाठी ग्रामपंचायतीची बदनामी करत आहेत. समोरासमोर बसून विकास कामे, आलेला निधी, खर्च झालेला निधी आम्ही गावाला दाखवू,पण असा बदनाम करण्याचा प्रयत्न करू नये, स्वच्छ व पारदर्शक कारभार ग्रामपंचायतीचा असल्याचे सरपंच पती आण्णासाहेब शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



काल दिनांक ५/४/२००२५ रोजी परळी शासकीय विश्रामगृह या ठिकाणी सकल मातंग समाजाच्या वतीने २० मार्च रोजी आझाद मैदान मुंबई या ठिकाणी होणाऱ्या मोर्चाच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजित केली होते. या प्रसंगी माझ्यासहित मातंग समाजाचे प्रमुख पदाधिकारी दिसत आहेत.

## राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी दिनकर जाधव यांची निवड

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले तथा



गेल्या दीड दशकाहून अधिक काळ पत्रकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत सामाजिक प्रश्न सरकार दरबारी मांडणारे पत्रकार दिनकर किसनराव जाधव यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जान असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या दीड दशकापासून त्यांच्या पत्रकारितेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिक अधिक आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी शासन दरबारी मांडत त्याचा पाठपुरावा केलेला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशाने राज्य सचिव दत्तात्रय मुजमुले यांनी दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## जातवैधता प्रमाणपत्रासाठी हिंदू–मुस्लिम संघटनेचा जिल्हाधिकारींना निवेदन

बीड । प्रतिनिधी

आज ६ मे २०२५ रोजी हिंदू मुस्लिम ओबीसी– भटके विमुक्त संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव आणि बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हंटले आहे की हिंदू मुस्लिम ओबीसी आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील अनेक समस्या प्रलंबित आहे जसे की बार्टी, मार्टी,सारथी, महाज्योती संस्थे प्रमाणे वनार्टी संस्थेला आणि मौलाना आझाद महामंडळ सह सर्व महामंडळाला भरीव निधी देणे, विशेष म्हणजे आता बारावी. निट. सी.ईटी. इत्यादी परिक्षा झाल्या असून आता मेडिकल वगैरे मधे प्रवेशासाठी जातवैधता प्रमाणपत्र अतिशय आवश्यक आहे त्यासाठी विद्यार्थी पालकांनी अर्ज दाखल केलेल्या आहेत, अनेक विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे प्रलंबित आहेत यासाठी सक्षम अधिकारी यांनी तातडीने आणि तात्काळ हिंदू मुस्लिमांतील पोटजातीचे तसेच ख्रिश्चन बौद्ध व इतर सर्व ओबीसी समाजातील लरींिंर–श्रळवळीं तात्काळ देण्यात यावे तसेच घरकुल योजना भटक्या नियुक्त साठी असलेली शहरी ग्रामीण पंतप्रधान आवास योजना भटके विमुक्त आणि हिंदू मुस्लिम ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे त्वरित बांधण्यात यावी, स्कॉलरशिप चे वाटप करावे, शैक्षणिक गरजेसाठी अतिशय आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र त्वरित देण्यात यावे, केंद्र व राज्य शासनाने राज्यघटनेने दिलेल्या अधिकारानुसार कलम ३४० अन्वये अनेक आयोग कमिटी समित्या गठीत केलेल्या आहेत त्यांचे शिफारशी लागू करण्यात यावे अशी मागणीचे निवेदन हिंदू मुस्लिम ओबीसी आणि भटके– विमुक्त संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी साहेबांना देण्यात आले आहे, ओबीसी ची सहुलते घेण्यासाठी मुलांच्या पालकांनी सुद्धा जागरूक रहावे असे आवाहन संघर्ष समितीने केले आहेत, यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव, शहराध्यक्ष खुर्शीद आलम, ओबीसी जिल्हाध्यक्ष शेख जाकेर,मोमीन खालेद,गुलाम जहाँगीर,मनोज चव्हाण, वजीर आत्तार,विजय गायकवाड,फारोक मन्यार, अशोक दुधाड, हकीम मन्यार, नबिल उजमा,मनोज चव्हाण,मजीद भाई, सुर्यकांत जोगदंड, शकील इनामदार,सलाम सेठ, दत्ता जाधव, सैय्यद फेरोज, भिमराव हाळे, अजहर सौदागर, अब्बास इनामदार,प्रशांत डोरले, मोईज भाई यांच्या सह अनेक हिंदू मुस्लिम ओबीसी बांधव उपस्थित होते.

# देवीची वर्गणी मुख्याधिपीकाने न दिल्याने शिवीगाळ करून व धमकी देऊन शासकीय कामात अडथळा केल्या प्रकरणी आरोपीस शिक्षा

बीड । प्रतिनिधी

मुख्याधिपीका / फिर्यादीने देवीची वर्गणी देण्यास नकार दिल्याच्याकारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून धमकी देऊन मुख्याधिपीका व शिक्षीका गोषवारा रजिस्टर भरत असताना हिसकावुन देवुन फेकुन दिले. शासकीय कामात अडथळा केल्या प्रकरणी मा. श्री. के. आर जोगळेकर साहेब अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश ४ बीड यांनी आरोपी व्यंकट रावसाहेब उगले रा. पालवन ता.जि.बीड यास कलम ३५३ भा.द.वि अन्वये दोषी ठरवुन दोन वर्ष सश्रम कारावास व ५००० रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ३८५ भा.द.वि अन्वये दोषी ठरवुन दोन वर्ष सश्रम कारावास व ५००० रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ५०६ भा.द.वि अन्वये दोषी ठरवुन दोन वर्ष सश्रम कारावास व ५००० रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सर्व शिक्षा एकत्रित भोगण्याचे आदेश केले आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकिकत अशी की, दि. २९/०९/२०१४ रोजी १४.०० ते १४.३० वा सुमारास फिर्यादी पालवण येथील जि.प.प्रा शाळा येथे त्यांच्या कार्यालयात शासकीय काम करत असताना आरोपी व्यंकट रावसाहेब उगले रा. पालवण ता.जि. बीड हा दारूच्या नशेत त्यांच्या कार्यालयात जाउन देवीच्या वर्गणीसाठी दहा हजार रूपयांची मागणी करू लागला त्यावेळी फिर्यादीने वर्गणी देण्यास नकार दिला असता आरोपीने कार्यालयातील टेबलावरील गोषवारा रजिस्टर टेबलच्या खाली फेकुन देवुन शिवीगाळ करू लागला व जर तुम्ही पोलीसांना माहिती दिली तर तुम्हाला शाळेवर येणे बंद करील अशी धमकी देवुन फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा आशयाच्या फिर्यादीवरून आरोपी व्यंकट रावसाहेब उगले रा. पालवण ता. जि.बीड यांच्या विरुध्द क. ३५३,३८५, ५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे पो. स्टे बीड ग्रामीण येथे गु.र.नं. १३२/२०१४ मध्ये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ. एन.जी. मुंडे यांनी केला. त्यांनी सदर प्रकरणात तपास करून आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

सदर प्रकरणाची सुनावणी मा. के. आर जोगळेकर साहेब अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, ४ बीड यांचे न्यायालयात झाली. सदर आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ४ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणात साक्षीदारांची साक्ष व घटनास्थळ पचं, फिर्यादी, व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दाखल अमलदार यांचे पुराव्याचे अवलोकन करून जिल्हा सरकारी वकिल ॲड. ए.बी. तिडके यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. के. आर जोगळेकर साहेब, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश ४ बीड यांनी आरोपी व्यंकट रावसाहेब उगले रा. पालवन ता.जि. बीड यांना क. ३५३ भा.द.वि दोन वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ३८५ भा.द.वि अन्वये दोषी ठरवुन दोन वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ५०६ भा.द.वि अन्वये दोषी ठरवुन दोन वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणा मध्ये सरकारी पक्षातर्फे अॅड. ए.बी. तिडके यांनी काम पाहिले. तसेच या प्रकरणी पैरवी अधिकारी म्हणुन श्री. सुरेश कदम पो.हे. कॉन्स्टेबल, बी.बी जायभाय पो.उप निरीक्षक यांनी सहकार्य केले.

पान १ वरून...

## माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ आणि समता परिषदेच्या लढ्याला मिळाले यश : ॲड. सुभाष राऊत

सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर फटाके वाजवून आणि पेढे वाटून न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याला आज मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. राज्यात सन २०२२ नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या बांठिया कमिशनने योग्यरित्या अहवाल गोळा न केल्याने ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले होते. या विरोधात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने सुप्रीम कोर्टात ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत माजी खासदार समीरभाऊ भुजबळ हे स्वतः विशेष लक्ष देऊन सुप्रीम कोर्टात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष प्रयत्न करत होते. याचिकेच्या सुनावणीदरम्यान माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ड. मंगेश ससाणे हे ज्येष्ठ वकिलांसह दिल्लीत उपस्थित होते. त्यांनी सर्वांशी चर्चा करून आपली भूमिका मांडली. या लढ्याला यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने सन २०२२ च्या पूर्वी असलेले ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम ठेऊन निवडणुका घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. ओबीसी, भटक्या विमुक्त समाजाच्या राजकीय अस्तित्वासाठी हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. गेल्या आठवडाभरात ओबीसींच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे दोन निर्णय झाले असल्याने ओबीसी समाजात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय, तसेच सुप्रीम कोर्टाने दिलेला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील निर्णय हे ओबीसींच्या अस्तित्वासाठी अतिशय महत्वाचे आहेत असे प्रतिपादन समता परिषदेचे राज्य सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केले आहे.

सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचे स्वागत करत बीड शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्री माता फुले यांच्या पुतळ्यासमोर बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला असून फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटप करण्यात आले.

यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत, परीट समाजाचे नेते गणेश जगताप, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे नेते ड. संदीप बेदरे, धनगर समाजाचे नेते रणजीत सोन्नर, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, मोहनराव गोरे, महेश व्यवहारे, निलेश राऊत, पांडुरंग सत्वधर, अजय काळे, रोहित जमदाडे, मंगेश जमदाडे, महेश चौधरी आदींसह समता सैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

## बीड जिल्हा रुग्णालयात उपचारात हलगर्जीपणा तर वनविभाग अनभिज्ञ

लिंबागणेश । प्रतिनिधी
वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २० लाखांपर्यंत मदत दिली जाते.१० लाख रूपये धनादेशाद्वारे तर १० लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या दरमहा व्याज देणा-या संयुक्त खात्यांमध्ये जमा केले जातात. तसेच अपंग झाल्यास ५ लाख रुपये, व्यक्ती गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार रुपये व किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपये औषधोपचारासाठी खर्च दिला जातो. मात्र बहुतेक वेळा याची माहिती वनविभागाला दिली जात नसल्याने जखमी मदतीपासून वंचित राहिल्याचे दिसून येते कारण मदतीसाठी हल्ला झाल्यानंतर ४८ तासाच्या आत वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे अपेक्षित असते तरच लाभास संबंधित पात्र ठरतो. नानासाहेब श्रीरंग हजारे यांच्या बाबतीत हल्ल्याची घटना उलटून १५ दिवस झाल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांच्याशी संवाद साधत बीड जिल्हा रुग्णालयातील कागदपत्रे तपासून सहानुभूती पुर्वक विचार करून मदत द्यावी अशी विनंती केल्यानंतर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन अशोक काकडे यांनी दिले आहे.

**बीड जिल्हा रुग्णालयात हेळसांड ; रानडुकराच्या हल्ल्यातील जखमी शेतकरी नानासाहेब हजारे यांची खंत**



दि.२० एप्रिल रोजी रात्री १० वाजता बीड तालुक्यातील पिंपरी गावातील शेतकरी नानासाहेब श्रीरंग हजारे हे तळ्याशेजारी असलेल्या शेतातील वैरणीच्या कडब्या शेजारी झोपलेल्या अवस्थेत असताना तळ्यावर पाणी पिण्यासाठी आलेल्या रानडुकरांनी हल्ला केला.त्यात त्यांचा जबडा फाटला असुन पायाला दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी औषधोपचारासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. त्याठिकाणी उपचाराची सोय नसल्याने त्यांना रूग्णवाहिकेतुन नेकनुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले. रात्री १२ वाजता नेकनुर ग्रामीण रुग्णालयातुन उपचाराची सोय नसल्याने बीडच्या जिल्हा रुग्णालयात पाठवले त्याठिकाणी केवळ एक इंजेक्शन दिले आणि एकदाच पट्टी केली. नानासाहेब हजारे यांनी उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी यांनी हलगर्जीपणा केल्याचा आरोप केला असुन सर्वसामान्य लोकांकडे जिल्हा रुग्णालयात लक्ष देत नसल्याची खंतही डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवली.

**वन्यप्राण्यांच्या हल्ल्यानंतर ४८ तासात कळवुन पंचनामा हि अट शिथिल करावी : डॉ.गणेश ढवळे**

बीड जिल्ह्यात मागच्या वर्षभरात शेतकरी व जनावरांवर वन्यप्राण्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. परंतु याची माहिती विभागीय वन कार्यालयाकडे उपलब्ध नसून ही माहिती रेंज कार्यालयाकडे असल्याचे तेथील कर्मचारी सांगतात. यावरून वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत किंवा जखमींना मदत दिली नसल्याचे दिसत आहे. बीड शहरातील विभागीय वन अधिकारी हे जिल्ह्याचे वनविभागाचे मुख्य कार्यालय असल्याने त्यांच्याकडे सर्व माहिती उपलब्ध असायला हवी. मात्र महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमींना मदत मिळण्यासाठी ४८ तासांच्या आत कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे बंधनकारक असुन तरच लाभ मिळतो.मात्र याविषयी शेतकऱ्यांना माहिती नसल्याने बहुतेक जखमी शासकीय मदतीपासून वंचित रहात असुन अटी मध्ये शिथिलता आणावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## चेक न वाटल्या प्रकरणी आरोपीस एक वर्ष साध्या कारावासाची शिक्षा व ७ लाख ५० हजार रुपये दंड

माजलगाव । प्रतिनिधी
फिर्यादी अप्पा इंद्रजीत गवते रा. गोविंदपूर ता. माजलगाव जिल्हा बीड यांचेकडून आरोपी यशवंत सीडस अँड फर्टीलाईजर माजलगावचे मालक कल्याण त्रिंबकराव गवते यांनी सहा महिन्याकरिता सात लाख रुपये हातउसने घेतले होते. सहा महिन्यानंतर अप्पा इंद्रजीत गवते यांनी कल्याण त्रिंबकराव गवते यांना दिलेले सात लाख रुपये परत मागितले असता आरोपी कल्याण त्रिंबकराव गवते यांनी कल्याण त्रिंबकराव गवते प्रो. प्रा यशवंत सीडस अँड फर्टिलायझर माजलगावचे नावे खाते असलेला दि.वैद्यनाथ अर्बन को.ऑफ.बँक. ली. शाखा माजलगाव येथील खाते न २३१/८४५ चा धनादेश नंबर ७४००२५ हा फिर्यादीस रक्कम टाकून त्याची सही करून दिनांक २४/९/२०१८ रोजी दिला व चेक जमा करून तुमचे रक्कम उचलून घ्या असे म्हणाला.


आरोपी कल्याण त्रिंबकराव गवते यांनी फिर्यादी अप्पा इंद्रजीत गवते यांना दिनांक २४/९/२०१८ रोजी दिलेला धनादेश त्याचे खाते असलेल्या मराठवाडा अर्बन को.ऑफ. क्रेडिट सोसायटी माजलगाव येथील खात्यावर दिनांक ४/१०/२०१८ रोजी जमा केला असता मराठवाडा क्रेडिट सोसायटी माजलगाव यांनी सदर धनादेश त्यांचे खाते असलेल्या महेश अर्बन को ऑफ. बँक शाखा माजलगाव येथे जमा केला असता



त्यानंतर महेश अर्बन बँक शाखा माजलगाव सदरचा धनादेश वटविण्यासाठी आरोपीचे खाते असलेल्या बँकेत पाठवला असता आरोपीचे खातेवर अपुरी निधी असल्याने चेक न वाटता फिर्यादीस महेश अर्बन बँक शखा माजलगाव यांनी दिनांक ४/१०/२०१८ रोजी मेमो व धनादेश परत दिला असता फिर्यादीने आरोपीस कायदेशीर नोटीस पाठून धनादेशावरील रकमेची मागणी केली असता आरोपीने फिर्यादीस नोटीसचे मुदतीमध्ये धनादेशावरील रक्कम न दिल्याने फिर्यादी आप्पा इंद्रजीत गवते यांनी मा. प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी साहेब माजलगाव यांच्या न्यायालयात कलम १३८ एन. आय ऍक्ट अन्वय फिर्याद दाखल केली होती.

सदरचे प्रकरणात फिर्यादीचे साक्ष नोंदवण्यात आली व आरोपीची देखील साक्ष नोंदवण्यात आली. आरोपीचे वतीन सदरचा धनादेश फिर्यादीने चोरून नेला,आरोपीला नोटीस मिळाली नाही, आरोपीला सातलाख रुपये देण्याची फिर्यादीची ऐपत नाही व सदर धनादेश आरोपीचा नाही असे बचाव घेण्यात आले परंतु फिर्यादीने दाखल केलेले कागदपत्रे व फिर्यादीचे वतीने केलेला कायदेशीर अंतिम युक्तिवाद गृहीत धरून दिनांक ५/५/२०२५ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी साहेब माजलगाव यांनी यशवंत सीडस अँड फर्टिलायझर माजलगावचे मालक आरोपी कल्याण त्रिंबकराव गवते यांना सातलाख पन्नास हजार रुपये दंड व एकवर्ष साध्या कारावासाची शिक्षा दिली. फिर्यादीचे वतीने अँड. व्हि.बी. लवटे यांचे मार्गदर्शनाखाली अँड आर.के गवते यांनी काम पाहिले व त्यांना अँड. एन.आर. जावळे यांनी सहकार्य केले.

## राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाची केज तालुका कार्यकारिणी जाहीर



केज । प्रतिनिधी
भारत सरकार मान्यता प्राप्त राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ केज तालुका कार्यकारणी जाहीर झाली असून राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम यांच्या आदेशाने तथा मराठवाडा कार्याध्यक्ष दशरथ रोडे याच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या केज तालुक्याच्या नव्या कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे.या नव्याने गठीत झालेल्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी अजय भांगे यांची फेरनिवड करण्यात आली असुन उपाध्यक्षपदी प्रखर लेखनीचे सुदेश दादा शिरसट यांची नियुक्ती तर संघटक म्हणून अजमोद्दीन इनामदार यांची आणि दै.जननेता चे संपादक सनी शेख यांची तालुका सचिव पदी फेरनिवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे केज तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.संघटनेच्या माध्यमा तूनपत्र कारांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावी पणे कार्य केले जाईल असा विश्वास दै.वादळ वार्ताचे संपादक तथा नवनिर्वाचीत केज तालुकाध्यक्ष अजय भांगे यांनी व्यक्त केला आहे. या निवडीमुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## स्व.अनिकेत सोनवणे यांचा पुण्य स्मरणार्थ बालग्राम अनाथ आश्रम येथे अन्नधान्य व खाऊचे वाटप



माजलगाव । प्रतिनिधी
स्वर्गीय अनिकेत सोनवणे याचा पाचव्या पुण्यस्मरणार्थ बालग्राम अनाथालय आश्रम येथे सोनवणे परिवाराकडून विद्यार्थ्यांना अन्नधान्य व खाऊचे वाटप करून करण्यात आला. अन्नदान हेच श्रेष्ठ दान हीच संकल्पना मनात ठेवून अभिनेत्री प्राची सोनवणे हिने आपला मोठा भाऊ स्वर्गीय अनिकेत सोनवणे याच्या पाचव्या पुण्यस्मरणार्थ दि ६ मे सोमवार रोजी बालग्राम सहारा अनाथालय आश्रम येथे अन्नधान्य व खाऊचे वाटप करून पुण्यस्मरणाचा कार्यक्रम करण्यात आला. आम्ही आमच्या भावाच्या पुण्यस्मरणार्थ विविध सामाजिक उपक्रम राबवत असतो. या पार्श्वभूमीवर याही वर्षी आम्ही विविध कार्यक्रम न घेता अन्नदान करूनच अनाथ आश्रम येथील चिमुकल्यांना खाऊ व अन्नदानचे वाटप केले असल्याची माहिती रुचीका सोनवणे, अनिल सोनवणे यांनी दिली.त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असुन अभिनेत्री प्राची सोनवणे यांच्या परिवाराचे कौतुक होत आहे. गेवराई तालुक्यातील बालग्राम सहारा अनाथालय आश्रम येथे या कार्यक्रमासाठी पत्रकार बाळासाहेब आडागळे, उषा सोनवणे, संतोष गर्जे, यासह आश्रमातील सर्व कर्मचारी, चिमुकले विद्यार्थिनी विद्यार्थी उपस्थित होते.

## कोल्हारवाडी येथे गुणवंतांचा सत्कार सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी
आज बीड तालुक्यातील कोल्हारवाडी गावात एच.एस.सी. परिक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सत्कार करुन अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



यावेळी बोलताना सिंघन अण्णा म्हणाले की, आपलं गाव हे ऊसतोड कामगारांचे, दुध विक्री करणाराचे व गोरगरीबांचे गाव आहे पण शैक्षणिक क्षेत्रात आता आपली मुलंमुली घवघवीत यश संपादन करीत गावच नाव लौकीक करीत आहेत, विविध शासकीय सेवेत उच्च पदावर आपली पोरं लागली आहेत याचा मला सार्थ अभिमान वाटतो, गेल्या ३५ वर्षांपासून मी आपल्या गावात विविध क्षेत्रातील गुंणवत व यश संपादन करणार्यांचा सत्कार व सन्मान करीत आलो आहे व यापुढेही श्वास असेपर्यंत सन्मान करीत राहीन. नवयुवक व युवतींनी जिद्द, मेहनत व चिकाटी ठेवून यश संपादन करण्यासाठी प्रयत्नशील रहावे असे भावनिक आवाहन सिंघन अण्णा यांनी केले. कार्यक्रमाला गावातील व परिसरातील लोक व महिलामंडळी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शब्दवेधच्या प्रा. सुरेश पुरी लोकपत्रकारिता पुरस्कारासाठी अमर हबीब यांची निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी
शब्दवेध बुक हाऊस प्रकाशन संस्थेच्या वतीने जनसंपर्क तज्ज्ञ प्रा. सुरेश पुरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, 'जनसंपर्क तज्ज्ञ प्रा.सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता' पुरस्काराची आज घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे पाहिले मानकरी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब, (अंबाजोगाई) यांची निवड करण्यात आली आहे.



शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने या वर्षापासून सदर पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. अकरा हजार रुपये रोख रक्कम, मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.पुरस्कार वितरणा दि.१८ मे रोजी सायंकाळी सहा वा. मौलाना आझाद संशोधन केंद्र,मजनु हिल,संभाजीनगर येथे होणार आहे. अमर हबीब यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शामनेर शिबिराचे आचार्य टाकळी येथे अस्थि कलशासह आगमन : भदंत धम्मदीप महाथेरो

सिरसाळा । प्रतिनिधी
दिनांक ६ मे रोजी श्रीलंका यातून अस्थी कलश्याचे आगमन आचार्य टाकळी या खेडेगावामध्ये झाले आहे. यानंतर बुद्ध वंदना संघ वंदना पूजनीय भन्तिजी धम्मदीप महाथेरो यांनी उपासक व उपाशीका यांना मार्गदर्शन केले व पूर्ण गावामध्ये अस्थिकलशाचे पदयात्रा काढण्यात आली आहे. त्यावेळी उपस्थित महिला व पुरुष जास्तीत जास्त लोकसंख्येने उपस्थित होते.



या कार्यक्रमाला प्रा. देविदास किरवले सर एडवोकेट सदाशिव किरवले सर उपस्थित होते. यामध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग दिसून आला. धम्मदीप महाथेरो यांनी बुद्धाचा धम्म बुद्धाच्या चरण बुद्ध चा संघ या असे सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सिरसाळा पोलीस स्टेशनचे पीएसआय आनंद जाधव व आशिष शेंगोळे यांचे उपस्थिती होती. यावेळी महिलांनी अन्नदान केले जवारी भाऊ इत्यादी अन्न दान दिले व पूजनीय भंतेजी यांना पाच शिवर दान करण्यात आले.

## मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायावर आधारित विशेष मुलाखत मालिका लवकरच सुरू : शेख इमरोज

बीड । प्रतिनिधी
आजाद पत्रकार शेख इमरोज़ शरीफ यांच्या पुढाकाराने, बीड जिल्ह्यातील लोकप्रिय हिंदी न्यूज चॅनल 'बीड न्यूज आप तक' वर



मुस्लिम समाजावर गेल्या काही वर्षांत झालेल्या अन्याय, अत्याचार, मॉब लिंचिंग, लव्ह जिहाद, धार्मिक द्वेष यासारख्या मुद्द्यांवर आधारित एक विशेष मुलाखत मालिका सुरू करण्यात येत आहे.

या मालिकेद्वारे, समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांशी – जसे की धर्मगुरू, (मौलवी, पंडित), सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पोलीस कर्मचारी, संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार, वकील, धार्मिक आणि राजकीय प्रतिनिधी –इत्यादींना थेट संवाद साधून त्यांच्या अनुभवांची, विचारांची आणि प्रश्नांची मांडणी केली जाणार आहे.

शेख इमरोज़ शरीफ म्हणाले की, या मालिकेचा उद्देश मुस्लिम समाजाच्या व्यथा आणि अन्याय जगासमोर मांडणे, तसेच देशात बंधुता आणि संविधानिक अधिकारांची जाणीव करून देणे आहे. या उपक्रमाद्वारे समाजाला जागवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे आणि ही मालिका पूर्णपणे शांततामय, कायदेशीर आणि पत्रकारितेच्या चौकटीत राहून राबवली जाणार आहे. आपली मतं मांडण्यासाठी किंवा सहभागी होण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा: शेख इमरोज़ शरीफ आजाद पत्रकार व संपादक – बीड न्यूज आप तक मो.: ७६२० ३४६ ३१३ या क्रमांकावर संपर्क साधावे असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

## सह्याद्री भुषण पुरस्कार -२०२५ चा वितरण सोहळा उत्साहात

### सह्याद्री मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संघाचा ५ मे रोजी प्रथम वर्धापनदिन सोहळा साजरा

केज । प्रतिनिधी
दि.५ मे रोजी केज येथे सह्याद्री मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त आयोजित सह्याद्री भुषण पुरस्कार २०२५ वितरण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केज तालुक्यातील जेष्ठ नेतृत्व व ज्यांनी आजवर आपल्या कारकीर्दीत विविध समाजोपयोगी पदे भुषविले असे थोर मार्गदर्शक मा.श्री अँड. राजेसाहेब देशमुख यांना सह्याद्री भुषण जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले तर नाव्होली येथील भुमिपुत्र मा.सि.ए. इनामदार (माजी नायब तहसीलदार) तथा कृषी व सामाजिक प्रश्नांवर आपला संघर्ष अविरत कार्याबद्दल सुरू ठेवणारे यांना कृषी व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल सह्याद्री भुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



केजच्या मातृभुमीत अक्षर बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक कार्यात सतत अग्रभागी असलेल्या संस्थेस सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.विष्णू यादव, सचिव श्री.विक्रम डोईफोडे, संचालक श्री. महादेव ढाकणे सर, संचालक तथा शिक्षक सहकारी पतसंस्था केजचे कोषाध्यक्ष श्री. किशोर भालेराव, उपाध्यक्ष श्री.युवराज हिरवे, श्री.सदस्य श्री.राहुल काकनाळे, श्री.राहुल उंडाळे इत्यादी यांच्या संस्थेस सामाजिक, शैक्षणिक, सह्याद्री भुषण पुरस्कार तर केज तालुक्यातील विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्यासाठी व केज तालुक्याचे नाव पटलावर आणण्यासाठी अविरत कार्य करणारे केज तालुका क्रीडा संयोजक मा.प्रा.विनोद गुंड सर यांना क्रीडा क्षेत्रासाठी सह्याद्री भुषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले व केज बसस्थानक येथे मागील अनेक वर्षां पासून अविरत क्रांती बुक स्टॉल केजच्या माध्यमातून वर्तमानपत्र वितरण सेवेतील कार्याबद्दल मा.श्री.दिलीप गवळी यांना सह्याद्री भुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सदरील वितरण समारंभ जेष्ठ मार्गदर्शक अँड. राजेसाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते व सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष गोविंद शिनगारे, प्रदेशाध्यक्ष डॉ.जावेद शेख, प्रदेश कार्याध्यक्ष शहाजी भोसले यांच्या विशेष उपस्थितीत मान्यवरांना सह्याद्री भुषण पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आले व यावेळी सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे केज तालुका अध्यक्ष श्री.अनिल ठोंबरे यांना वाढदिवसानिमित्त उपस्थित सर्वांच्या वतीने सह्याद्री भुषण सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

यावेळी संघाच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त सर्व पत्रकार पदाधिकारी यांचा सत्कार उपस्थितांच्या हस्ते करण्यात येऊन संघाच्या प्रथम वर्धापन दिना निमित्त सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना भरभरून शुभेच्छा देत संघाच्या कामगिरीचे कौतुक केले व येणाऱ्या काळात कोणत्याही मदतीसाठी आम्हाला हाक द्या असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. यावेळी सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे श्री.सुमंत कदम, पुणे जिल्हा अध्यक्ष अशोक मोरे,पुणे जिल्हा सचिव इंजि.दत्ता शिनगारे, बीड जिल्हा अध्यक्ष विनोद शिंदे, बीड जिल्हा सचिव अर्शद सय्यद, अंबाजोगाई तालुका अध्यक्ष प्रा.दत्ता जाधव, आष्टी तालुका अध्यक्ष मेजर विकास म्हस्के, अंबाजोगाई तालुका सचिव गोविंद लांडगे युवा कार्यकर्ते श्री.युवराज मगर यांची विशेष उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्य आयोजक सह्याद्री मराठी पत्रकार संघ केज तालुका कार्यकारिणीचे अध्यक्ष अनिल ठोंबरे सचिव श्री.डॉ लतिफ शेख,कार्याध्यक्ष श्री.महादेव दौंड,उपाध्यक्ष श्री.दत्तात्रय भाकरे, सदस्य अर्शद शेख,बीड तालुका उपाध्यक्ष श्री.दिलीप बेलवडकर,सदस्य श्री.अनिल कांबळे यांनी अथक परिश्रम घेतले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद शिनगारे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.जावेद शेख यांनी केले व सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# माजी आ.लक्ष्मण पवारांच्या कार्यकिर्दीत सुरू केलेल्या चकलांबा-गेवराई रस्त्यांवर धुराळा?

## रस्त्यावर धुराळा उडवत रंगला वाहनांचा थरार : वाहनचालकांची तारांबळ?

- रस्त्यांच्या कामाचा कंपनीच्या ठेकेदाराकडून खेळखंडोबा?
- रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य, वाहनचालकांसह नागरिक हैराण!
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?



गेवराई । प्रतिनिधी

मागील तीन वर्षापासून सुरू असलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा सुरू असलेल्या काम खूप संथ गतीने चालू आहे तरी सदरील विभागाने या कामात दिरंगाई करणाऱ्या कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी याबाबत सविस्तर वृत्त असे की असा की मागील तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा हा रस्ता सदरील कंपनी खूपच धिम्या गतीने काम करत आहे व या कामाचा फटका या रोडवर असलेल्या गावांना खूप त्रास सहन करावा लागत आहे या धुळीच्या त्रासामुळे की त्यांनी कित्येक लोकांच्या आरोग्यावर खूप परिणाम होत आहे तरी माननीय बांधकाम विभागाने या कंपनीला लवकरात लवकर या रस्त्यांचे काम पूर्ण करावे व जनतेची होणारे हाल पाहून पावसाळ्यापूर्वी सदरील काम कसे पूर्ण होईल याकडे विभागाने लक्ष्य द्यावें अशी मागणी होत आहे

कंपनीच्या हलगर्जीपणामुळे, माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर केलेल्या हाय युमुनिटी अंतर्गत मंजूर केलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा हा रस्ता सदरील कंपनीच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे मागील तीन ते चार वर्षापासून अत्यंत धिम्या गतीने सुरू असुन कंपनीच्या ठेकेदारामुळे या रस्त्याचे कासव गतीने सुरू आहे कंपनीच्या हलगर्जीपणामुळे या कामाला सातत्याने उशीर होत आहे. या कामातील जेमतेम पस्तीस टक्के काम पूर्ण झाले असून मात्र त्यांचा दर्जा समाधानकारक नाही रस्त्यावरील वाहतूक वाढत असल्याने आधीच या रस्त्याची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यात भर म्हणून आता धुळीने नागरिकांना हैराण केले आहे. त्यामुळे या धुळीने स्थानिकांना श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर काहीतरी उपाय करणे आवश्यक आहे. या रस्त्याला सतत गर्दी असते.

शेतकरी बांधवाचे वाहने, बैलगाड्यांची ये-जा सुरूच असते. यामुळे ठिकठिकाणची धूळ आजूबाजूच्या घरांमध्ये पसरत आहे. वाहतुकीसाठी पूरक रस्ता कमी आणि खड्डेच जास्त अशी परिस्थिती आहे.येथिल परिसरात शाळा असल्याने शालेय विद्यार्थ्यांचा वावर नेहमी असतो. त्यामुळे वाहनांमुळे उडणारी धूळ रस्त्यावरून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह स्थानिकांना त्रासदायक बाब झाली आहे. आधीच त्रास आहेच. आता त्यात धुळीचीही भर पडली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांतून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत.

## भीषण पाणी टंचाई विरोधात शुक्रवारी होणाऱ्या हंडा मोर्च्यात शामिल व्हा : रूपाली देशपांडे

बीड । प्रतिनिधी



सध्या तीव्र उन्हामुळे उन्हाची तीव्रता वाढली असून बीड शहर व परिसरात बीड नगरपरिषद च्या हलगर्जी पणा मुळे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे नागरिकांना पाण्यासाठी वन वन फिरावे लागतात येणाऱ्या शुक्रवारी ९ मे २०२५ रोजीच्या हंडा मोर्च्यास शरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शामिल व्हावे असे आव्हान समाजसेविका रूपाली देशपांडे यांनी केले.

या बाबत पुढे बोलताना रुपाली देशपांडे यांनी सांगितले बिंदुसरा धरण व माजलगाव बॅक वॉटर योजनेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा केला जातो. परंतु माजलगाव बॅक वॉटर काडी वडगाव येथे अनेक दिवसापासून पाईपलाइन फुटून सुद्धा बीड नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्याने शरातील नागरिक पाण्यासाठी वण वण फिरत असल्यामुळे बीड शरातील अनेक नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते विविध पक्षातील नेत्याच्या उपस्थित दिनांक ९ मे २०२५ रोजी शुक्रवार वेळ सकाळी ११ वाजता बलभीम चौक ते बीड नगरपरिषद कार्यालयावर नागरिकांच्या पाणी संदर्भात हंडा मोर्चात शहरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आव्हान समाजसेविका रुपालीताई देशपांडे यांनी केले.

## प्रशासनाच्या विरोधात निघणाऱ्या मोर्चा मोठ्या संख्येने उपस्थित रहा : मुळूक, विधाते

बीड । प्रतिनिधी





बीड शहर मागील सहा महिन्यापासून नगरपरिषदेच्या व निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधी च्या ढिसाळ कारभारामुळे पाणीटंचाईला सामोरा जात आहे. बीड नगर परिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन नसल्यामुळे शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दारोदार फिरावे लागत आहे व स्वतःच्या खिशाला कात्री लावून पाणी विकत घेण्याची वेळ बीड शहरातील नागरिकांवर आलेली आहे. पाणी मुबलक प्रमाणात असतानादेखील नियोजन नसल्यामुळे व फक्त फोटो सेशन करुन आम्हीच सर्व काही करत आहोत हे दाखवल्याशिवाय काही झालेच नाही. शहरातील नागरिक पाणी विकत घेऊ शकत नाहीत ते डोक्यावर हंडा घेऊन पाण्याच्या शोधामध्ये फिरत असल्याचे चित्र बीड शहरामध्ये सध्या दिसत आहे बीड शहराचे लोकप्रतिनिधी चमकोगिरी करण्यामध्येच आपली धन्यता मानत असून अनेक वर्षापासून शेकडो कोटींहून अधिक खर्च करुन व माजलगाव बॅक वॉटर व बिंदुसरा पाणी परवठा या दोन्ही धरणात पाणी साठा असून ही शहरातील लोकांना का त्रास दिला जातो.

पाणीटंचाई, स्वच्छता, विद्युत लाइट यासंदर्भातील बीड नगर परिषदेमध्ये अनेक वर्षांपूर्वीच्या समस्या आज ही जशाच्या तसे आहेत त्यामुळे नगरपरिषद प्रशासना विरोधात जनतेच्या मनामध्ये प्रचंड राग व असंतोष निर्माण झालेला आहे यालाच वाचा फोडण्यासाठी दिनांक ९ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता बलभीम चौक बीड ते बीड नगर परिषद असा भव्य हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले असून या भव्य मोर्चा मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन नगरसेवक विनोद मुळूक, विलास विधाते, शेख अमर, रणजित बनसोडे, गणेश तांदळे, रमेशराव चव्हाण, सय्यद इलियास, मुन्नाभाई इनामदार यांनी केले आहे.

## केज येथे मल्टिस्टेट ठेवीदारांचे आक्रोश आंदोलन

### ठेवी परत मिळाव्यात यासाठी तहसील कार्यालयास दिले निवेदन

केज । प्रतिनिधी



ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, छत्रपती मल्टि स्टेट क्रेडिट सोसायटी मधील ठेवीदारांनी त्यांच्या ठेवी परत मिळाव्यात यासाठी केज तहसील कार्यालयात निवेदन दिले आहे. गेल्या दोन वर्षांपासून ही मल्टिस्टेट संस्था बंद असून असंख्य ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत. यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून, शिक्षण, औषधे, लग्न, शेती, व्यवसाय यासाठी लागणारे पैसे मिळत नसल्याने सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. अरवले किरण शंकर आणि इतर ठेवीदारांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित संस्थेच्या संचालक मंडळाची चौकशी करून त्यांच्या मालमत्तेची जप्ती करण्यात यावी व ठेवीदारांचे पैसे परत मिळवून द्यावेत. या आधी संबंधित मंत्र्यांकडे व प्रशासनाकडे निवेदने दिली असली तरी काहीच कारवाई झाली नाही अशीही तक्रार करण्यात आली.

ठेवीदारांनी प्रशासना कडे मागणी केली की, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ अटक करावी. त्यांची संपत्ती जप्त करून ठेवीदारांना पैसे परत द्यावेत. बेकायदेशीर विकलेली मालमत्ता, वाहने यांचीही चौकशी व्हावी. या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी ठेवीदारांची अपेक्षा आहे. ठेवीदारांनी कानडी रोड ते तहसील कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला व नायब तहसीलदार श्रीमती आशा वाघ यांना निवेदन देण्यात आले आहे.



## पालवण चौक पाण्याच्या टाकीवर पंकज धांडेचे शोले स्टाईल आंदोलन

बीड । प्रतिनिधी

सरकार बदलले पालकमंत्री बदलले परंतु अद्या बीड शहर पाण्याचा प्रश्न टांगणीलाच आहे. शहरात सर्वत्र नागरिकांचा आक्रोश व्यक्त केला जातोय. दुष्काळाच्या तीव्र झळा सुरू असतानाच बीड शहराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन ही खराब झाली असल्याने गेल्या ३३ दिवसापासून बीड शहराला पाणी आलेले नाही. त्यामुळे येथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसापासून पाण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे आंदोलनेही करण्यात आले आहेत. परंतू प्रशासनाला याची जाग आल्याचे दिसून येत नाही. मंगळवारी रात्री ७ ते १२ पंकज धांडे, अविनाश कांबळे, अक्षय दळवी यांच्यासह काही युवक पालवन चौक येथील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. अखेर रात्री ११ वाजता टाकीत पाणी पडले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पुढाकार घेतल्यानंतर पाणीपुरवठा इंजिनीयर माने व शिवाजी नगर पोलिसांनी त्यांनी समजूत काढून त्यांचे आंदोलन स्थगित केले. बीड शहराला गेल्या ३३ दिवसापासून नळाला पाणी आलेले नाही. त्यामुळे शहरभर नागरीकांचे हाल होताना दिसत आहे. तर गेली वीस वर्षापासून वीस दिवसाला पाणी सोडले जाते. लाईट बिल अभावी नागरिकांना पाणी मिळत नाही ही समस्या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडली परंतु अजितदादा पवार यांनी अध्याप यावर तोडगा काढलेला नाही. नाव मोठा आणि लक्ष्मी खोटं या मनीप्रमाणे अजित दादांनी या प्रश्नाकडे डोळे झाक केल्यामुळे बिडकारांचे प्रचंड हाल होत आहेत.

आज पालवन चौक येथील युवकांनी पाण्याच्या टाकीवर चढून युवकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या युवकांचे नागरिकाकडून कौतुक केले जात आहे. सातग्रस्त नागरिक अशाच प्रकारे पुढे येऊन प्रत्येक वार्डात आंदोलन होऊ शकते. महिला नागरिक प्रशासना समोर आपली व्यथा मांडण्यासाठी मोर्चे काढून आपल्या भावना व्यक्त करू शकतात. बिडकारांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता पालकमंत्री अजित दादा पवार यांनी या प्रश्नाला प्रथम प्राधान्य देऊन तातडीने हा प्रश्न सोडवला पाहिजे व बीडकरांना नियमित पाणीपुरवठा केला पाहिजे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## बीड शहरवासियांना चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा व घंटागाडी नियमित चालू करा : गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी



बीडकरांच्या जिव्हाळ्याचा व मुलभूत असा पाणीप्रश्न, घंटागाडी, स्वच्छ्तेसह विविध प्रश्नांवर आज काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात नगर पालिका प्रशासनाला घेराव घालन्यात आला.

बीड शहरवासीयांची प्रचंड अवहेलना नगर पालिका प्रशासनाकडून सुरु असुन महिनाभरात एकदा ते पण अस्वच्छ पाणी शहरात सोडण्याचा महाप्रताप नगर पालिका करत असुन तो तत्काळ थांबवावा व शहरवासीयांना किमान चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा. त्याच बरोबर शहरात कचरा गोळा करण्यासाठी असलेली नियमित घंटागाडी फक्त नावालाच आहे की काय ती कुठेही नियमितपणे आढळुन येत नाही. ती नियमित शहराच्या सर्व भागात घंटागाडी तत्काळ सुरू करण्यात यावी. शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग उचलण्यात यावेत. शहरातील नाल्या चार चार महिने नकाढल्यामुळे कोंडलेल्या आहेत त्या पहिल्याच पावसात तुडुंब भरुन रस्त्यावर गटारगंगा वाहील यासाठी नाल्या तत्काळ काढण्यात याव्यात व किमान आठ दिवसाला नियमित सर्व नाल्या काढल्या जाव्यात. त्याच बरोबर नगर पालिकेने जमा केलेला कचरा शहरात किंवा शहरवासीयांना त्रास होईल अशा ठिकाणी टाकु नये. यासर्व शहरवासीयांच्या महत्वाच्या प्रश्नांवर आज काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर पालिकेचे मुख्याधिकरी अंधारे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील, ओबीसीचे नेते गणेश राउत, ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव, इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, मनावधिकरचे जिल्हाध्यक्ष शेख रियाज, बीड तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष शेख कादर बाबा इनामदार, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हनुमान घोडके, अल्पसंख्यांकचे तालुकाध्यक्ष शेख बबलु भाई, शेख नजीर, अशोक जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## वृक्ष मित्र सुधाकर देशमुख यांनी केले वैभवी देशमुखचे अभिनंदन, रोपटे देऊन केला सन्मान

केज । प्रतिनिधी

काल इयत्ता १२ वी चा निकाल लागला आहे. आणि मंगळवारी दि.६ मे २०२५ रोजी संघर्ष कन्या वैभवी संतोष देशमुख चा वाढदिवस होता. त्यानिमित्त मस्साजोगला जाऊन तिचा बहवा वृक्षाचे रोपटे देऊन तिचा सत्कार केला. आणि तिच्या वाढदिवसाच्या निमित्त वृक्षमित्र अभियान अंतर्गत चालवण्यात येत असलेल्या संत तुकाराम महाराज रोपवाटीके तर्फे एक हजार रोप भेट देण्याचे जाहीर केले.

या प्रसंगी उपस्थीतीत धनंजय भैया देशमुख, राजेसाहेब देशमुख, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, सामाजिक कार्यकर्ते ईश्वर भैय्या शिंदे, मदनलाल परदेशी, अमर शिंदे, उपसरपंच गिता, साळुंके दादा आदी मान्यवर उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT